| वर्ष - 9 । अंक -12 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

www.mahaenews.com । बुधवार, दि. 27 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



वेलकम बाप्पा!

गणपती गजानन वक्रतुंड लंबोदर,
हरले दुःख सर्व, सुख आले दारी,
ढोल ताशा वाजंत्री वाजवाया झाली तयारी
गणेशोत्सवाचे स्वागत होणार लयभारी,

**गणेश चतुर्थीच्या हार्दिक शुभेच्छा!**



**बाप्पाच्या स्वागताची जय्यत तयारी** यंदा नागरिकांच्या सोयींसाठी पोलीस ठाण्यांद्वारे विविध उपाययोजना

# पोलिसांचा कडक बंदोबस्त!

## गणेशोत्सव शांततेत पार पडण्यासाठी पिंपरी-चिंचवड, पुणे पोलीस आयुक्तालयाने जय्यत तयारी

। पिंपरी/पुणे/मुंबई
। प्रतिनिधी । महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहरात गणेशोत्सव शांततेत पार पडण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाने जय्यत तयारी केली आहे. तीन हजारांहून अधिक पोलिसांचा बंदोबस्त तैनात असणार आहे. या वर्षी आयुक्तालयाच्या हद्दीत दोन हजार १४६ सार्वजनिक गणपती आणि दोन लाख ६५ हजार २७४ घरगुती गणपतींची स्थापना होणार आहे. सार्वजनिक गणेश विसर्जन ४५ घाटांवर होणार असून, सातव्या दिवशी ५२१ गणपती, नवव्या दिवशी २३६ गणपती, दहाव्या दिवशी ३७३ गणपती, अकराव्या दिवशी ९५९ गणपतींचे विसर्जन होणार आहे. उत्सवादरम्यान वाहतूक कोंडी टाळण्यासाठी, शहरातील महत्त्वाच्या चौकांमध्ये वाहतूक पोलीस तैनात करण्यात आले आहेत. त्यांच्या मदतीसाठी दोन अधिकारी आणि शंभर होमगार्ड्सचे अतिरिक्त मनुष्यबळ पुरवण्यात आले आहे. विसर्जनाच्या सातव्या आणि अकराव्या दिवशी ३८ महत्त्वाच्या मिरवणूक मार्गांवरील वाहतूक वळवण्यात आली आहे. मुंबई पोलिसांनी गणपतीच्या आगमनापासून विसर्जनापर्यंत कडक सुरक्षा ठेवली आहे. गर्दी आणि संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी ड्रोन, आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) तंत्रज्ञान आणि विशेष दल तैनात केले आहेत.**



नागरिकांना अडचण येऊ नये यासाठी पोलीस ठाण्यांनी विविध उपाययोजना केल्या आहेत. पोलीस उपायुक्त, पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी आणि परिमंडळीय पोलीस उपायुक्त यांनी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे, शांतता समिती, ध्वनीवर्धक चालक, मालक आणि सरकारी विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत बैठका घेतल्या आहेत. डीजे, ध्वनीवर्धक, प्रकाशझोताचा वापर टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी एक हजार ८०९ समाजकंटकांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असल्याचे अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड यांनी सांगितले.

उत्सव काळात शांतता राखण्यासाठी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. यात एक पोलीस सह आयुक्त, एक अपर पोलीस आयुक्त, सहा पोलीस उपायुक्त, नऊ सहायक पोलीस आयुक्त, ६४ पोलीस निरीक्षक, २९१ सहायक, उपनिरीक्षक, दोन हजार ३५५ पोलीस अंमलदार, ४०० होमगार्ड, एक बीडीडीएस पथक असा बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे.

## गणेशोत्सवात पुण्यात ७००० पोलिस तैनात

पुणे पोलिस देखील गणेशोत्सवासाठी सज्ज झाले आहेत. आज पुणे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी पत्रकार परिषद घेत गणेशोत्सव तयारीची माहिती दिली. गणेशोत्सवादरम्यान पुण्यातील सर्वच ठिकाणी पोलिसांचा कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यंदाच्या गणेशोत्सवामध्ये एआय कॅमेऱ्यांच्या नजरा असणार आहेत. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुण्यात ७००० पोलिस तैनात असणार आहेत. पोलिस आयुक्त, पोलिस सह आयुक्त, अपर पोलिस आयुक्त, १० पोलिस उपयुक्त, २७ सहायक पोलिस आयुक्त, १५४ पोलिस निरीक्षक, ६१८ सहनपोलीस निरीक्षक, ६२८६ अंमलदार, १६ स्ट्रायकर, १४ क्यू आर टी हिट, ७ बी डी डी ए स पथके, ११०० होमगार्ड, १ एस आर पी एफ कंपनी गणेशोत्सव काळात सज्ज राहणार आहे. पुणे शहरात एकूण ३९५९ सार्वजनिक गणेश मंडळे आहेत. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी एकूण ८२ बैठक घेतल्या आहेत. प्रत्येक महत्वाच्या चौकात एआय कॅमेऱ्याचे लक्ष ठेवले जाणार आहे. चेंगराचेंगरी परिस्थिती उद्भवू नये म्हणून विशेष गर्दीवर नियोजन करण्यात आले आहे. ३० ऑगस्ट ते ४ सप्टेंबर आणि ६ सप्टेंबर असे ७ दिवस सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनिक्षेपक यांना परवानगी देण्यात आली आहे.

### चौकांमध्ये वाहतूक पोलीस तैनात

मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात 27 ऑगस्ट 2025 पासून गणेशोत्सव सुरु होणार आहे. लालबागचा राजा, चिंतामणी गणेश यासारख्या प्रमुख मंडळांमध्ये भाविकांची मोठी गर्दी होण्याची अपेक्षा आहे. यावेळी सुरक्षेत कोणतीही चूक होऊ नये म्हणून मुंबई पोलिसांनी व्यापक आणि कडक बंदोबस्त केला आहे. यंदा गणेशोत्सव 27 ऑगस्ट ते 6 सप्टेंबर दरम्यान चालेल, ज्यात दीड दिवस, तीन दिवस, पाच दिवस आणि सात दिवसांचे उत्सव समाविष्ट आहेत.

### ड्रोन, एआयच्या मदतीने सुरक्षा -

मुंबई पोलिसांनी गणपतीच्या आगमनापासून विसर्जनापर्यंत कडक सुरक्षा ठेवली आहे. गर्दी आणि संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी ड्रोन, आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) तंत्रज्ञान आणि विशेष दल तैनात केले आहेत. सहआयुक्त सत्यनारायण चौधरी यांनी सांगितले की शहरात 18 हजारहून अधिक पोलिस तैनात केले जातील.

### 11 हजारहून अधिक CCTV आणि ड्रोन निगराणी -

शहरातील 11 हजार हून अधिक सार्वजनिक गणेश मंडळे आणि गर्दीच्या ठिकाणी ड्रोन कॅमेऱ्यांद्वारे 24 तास लक्ष ठेवले जाईल. याशिवाय, शहराच्या प्रत्येक कोपऱ्यात 11 हजार हून अधिक सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत राहतील. लालबागचा राजा आणि इतर प्रमुख मंडळांसाठी 500 हून अधिक पोलिस, श्वान पथके आणि बॉम्ब शोधक दल तैनात केले जातील.

### विसर्जन स्थळांवर बंदोबस्त -

दरम्यान, गिरगाव चौपाटी, जुहू चौपाटी, शिवाजी पार्क, मालवणी आणि इतर प्रमुख विसर्जन स्थळांवर 450 मोबाईल पेट्रोलिंग व्हॅन आणि 350 बीट मार्शल गस्त करतील. मुख्य विसर्जनाच्या दिवशी 5000 अतिरिक्त पोलिस तैनात केले जातील. तथापी, महिला, मुले आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.

### वाहतूक आणि आवाजावर निर्बंध

कुलाबा, मरीन ड्राइव्ह, गिरगाव, दादर, शिवाजी पार्क, लालबाग, परळ, भायखळा आणि बोरिवली येथे वाहतूक बंद किंवा वळवली जाईल. विसर्जनाच्या दिवशी 24 तास वाहतूक बंदी असेल. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार रात्री 10 ते सकाळी 6 वाजेपर्यंत 50 डेसिबलपेक्षा जास्त आवाजावर बंदी आहे.

**गैरव्यवहाराबाबत तक्रारी** चौकशीसाठी पवारांची मुख्यमंत्र्यांकडे तातडीची मागणी

# पुणे बाजार समितीत गैरकारभार

## शरद पवारांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीतील विद्यमान संचालक मंडळाकडून सुरू असलेल्या आर्थिक अनियमितता, गैरव्यवहाराबाबत गंभीर तक्रारी आहेत. त्यामुळे बाजार समितीच्या गैरव्यवहाराच्या चौकशीवर तातडीने कार्यवाही कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार) अध्यक्ष, खासदार शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.**



पुणे बाजार समितीतील गैरकारभार पावसाळी अधिवेशनात चव्हाट्यावर आला होता. यावेळी बाजार समितीने घेतलेले सर्व निर्णय रद्द करून, बाजार समितीच्या कारभाराची चौकशी करण्याची घोषणा पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केली होती. त्यानंतर ही बाजार समितीतील गैरव्यवहार आणि भ्रष्टाचाराच्या चौकशीबाबत शासनाकडून दिरंगाई होत असल्याचा आरोप शेतकरी संघर्ष कृती समितीचे अध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार प्रवक्ते विकास लवांडे यांनी केला आहे.पवार यांनी दिलेल्या पत्रासोबत लवांडे यांनी दिलेले निवेदन जोडण्यात आले आहे. या प्रकरणाची चौकशी करून झालेली कार्यवाही कळवावी, असेही म्हटले आहे. लवांडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पणनमंत्री जयकुमार रावल आणि पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांना निवेदन सादर केले आहे.पणन मंत्र्यांनी पावसाळी अधिवेशनात उच्चस्तरीय चौकशीची घोषणा केली होती; मात्र आजवर चौकशी समिती स्थापन झालेली नाही. ७ जुलै २०२५ रोजी पणन संचालकांनी चौकशीचे आदेश देत जिल्हा उपनिबंधक प्रकाश जगताप यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती. मात्र हेच अधिकारी बाजार समितीतील गैरकारभाराला पाठबळ देतात, असा आरोप लवांडे यांनी केला आहे.लवांडे यांनी विद्यमान सभापती व काही संचालकांवर गंभीर आरोप करत मुळाणी समितीच्या अहवालात दोषी ठरलेल्या सदस्यांवर कारवाई का होत नाही, असा प्रश्न उपस्थित केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाखाली गैरकारभार सुरू आहे. अजित

### गैरव्यवहाराबाबत गंभीर तक्रारी

बाजार समितीच्या कारभाराची चौकशी करण्याची घोषणा पणन मंत्री जयकुमार रावळ यांनी केली होती. त्यानंतर ही बाजार समितीतील गैरव्यवहार आणि भ्रष्टाचाराच्या चौकशीबाबत शासनाकडून दिरंगाई होत असल्याचा आरोप शेतकरी संघर्ष कृती समितीचे अध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार प्रवक्ते विकास लवांडे यांनी केला आहे.

पवार यांचे नाव सांगून संचालक मंडळाची दहशत आणि दादागिरी सुरू आहे. या संचालक मंडळाच्या दहशती विरोधात कोणीही आवाज उठवण्यास तयार नाही, असेही त्यांनी म्हटले.काही संचालकांनी बाजार आवारातील प्रत्येक चौकातील महत्त्वाच्या एकूण ५७ जागा बेकायदा स्वतःकडे घेऊन या जागांवर प्रत्येकी पाच ते सात भाडेकरू ठेवून, काही टपऱ्या थाटून मासिक सुमारे ८० लाख रुपये गोळा केले जात आहेत. हे सर्व पालकमंत्र्यांच्या आदेशांप्रमाणे सुरू आहे, असे सांगितले जात आहे.विशेष महत्त्वाची बाब म्हणजे, सुमारे २० वर्षांपूर्वीच्या मुळानी चौकशी अहवालातील जे संचालक गंभीर दोषी आढळून आले आहेत. ज्यांच्याकडे वैयक्तिकरित्या काळ्या कारनाम्यांबाबत शासनाने वसुलीचे आदेश दिलेले आहेत, त्यांचा ही यादीमध्ये समावेश आहे. विधिमंडळात प्रश्न उपस्थित होऊन देखील या संचालकांचा गैरकारभार सुरू आहे. शासनाकडून अशा संचालकांची सर्रास पाठराखण होत आहे. बाजार समितीतील बडे संचालक बाजार समितीचा मनमानी पद्धतीने उपयोग करून घेत आहेत. कायद्याचा स्वतःच्या सोयीने अर्थ लावत आहेत. बाजार समितीच्या जागा परस्पर भाड्याने देत आहेत. अनेक ठिकाणी सुरक्षा रक्षक नाहीत. त्यामुळे बाजार समितीत चोऱ्या वाढल्या आहेत. शेतीमालाच्या चोऱ्या वाढल्यामुळे शेतकरी हैराण झाले आहेत, दुसरीकडे बाजार समितीत सुरक्षा रक्षक तैनात आहेत.

# मतदार नोंदणी पडताळणीस अडविलेले नाही

## ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे स्पष्टीकरण

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**काँग्रेसची बुथपातळीवरील यंत्रणा संपुष्टात आली आहे. याउलट भारतीय जनता पक्षाची बुथ पातळीवरील यंत्रणा सक्षम असल्याने नवमतदारांची नावनोंदणी मोठ्या प्रमाणात झाली आहे. यावर कोणाला आक्षेप असेल, तर बिहारप्रमाणे महाराष्ट्रात मतदार नोंदणीची पडताळणी करण्यास कोणालाही अडविलेले नाही.**



असा टोला ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी काँग्रेसला लगावला. डिसेंबरपर्यंत जिल्हा परिषद आणि महापालिका निवडणुका पूर्ण होतील, असेही त्यांनी सांगितले.देशात गेल्या काही दिवसांपासून मतचोरीचा मुद्दा जोरदार गाजत आहे.याबाबत प्रसारमाध्यमांशी बोलताना गोरे म्हणाले, ‘मतचोरीचा मुद्दा मांडत देशात अशांतता, अस्वस्थता पसरविण्यात येत आहे. काँग्रेसने त्यांची पक्षव्यवस्था सुधारावी. वयाची अठरा वर्षे पूर्ण झालेल्या नवमतदारांची नोंदणी भाजपने बूथपातळीवर केली. मात्र, काँग्रेसची अशी यंत्रणा आता अस्तित्वात नाही. त्यामुळे त्यांना याचा त्रास होत आहे.

### मुख्यमंत्र्यांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न

दीड लाख उद्योजक उभे केले. वसतिगृह शुल्कात सवलत दिली. त्यामुळे जरांगे यांच्या आंदोलनामुळे जे चालले आहे, ते योग्य नाही.’देशात गेल्या काही दिवसांपासून मतचोरीचा मुद्दा जोरदार गाजत आहे. याबाबत प्रसारमाध्यमांशी बोलताना गोरे म्हणाले, ‘मतचोरीचा मुद्दा मांडत देशात अशांतता, अस्वस्थता पसरविण्यात येत आहे.

निवडणूक आयेगाला मतदारांची नोंदणी तपासण्यास कोणीही अडविलेले नाही. पाच वर्षांत मतदारांशी संख्या वाढणारच आहे. भाजपची यंत्रणा पाच वर्षे सातत्याने कार्यरत असते. त्यामुळे निवडणुकीसाठी आम्ही कधीही तयारीत असतो.’मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे यांच्या आंदोलनाबाबत ग्रामविकास मंत्री गोरे म्हणाले, ‘जरांगे आंदोलन का करीत आहेत, ते मला माहीत नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लक्ष्य करण्यासाठी हे चालले आहे. समाज बांधवांना जे अपेक्षित आहे, ते त्यांना दिले आहे. फडणवीस यांनी दहा टक्के आरक्षण दिले.

जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञान

भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

# पिंपरी-चिंचवडमध्ये 'आयआयएम' उभारणीचा "श्रीगणेशा"!

## राज्याचे महसूल मंत्री बावनकुळे यांचा जागा उपलब्धतेस हिरवा कंदील

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**उद्योग नगरी, कामगार नगरी, आयटी हब आणि ऑटो हब अशी ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरात आता देशातील नामांकित भारतीय व्यवस्थापन संस्था (IIM-नागपूर) ची शाखा सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सर्वत्र गणेश आगमनाचा उत्साह सुरू असतानाच शहरात आता आयआयएम सारखी नामांकित संस्था सुरू करण्याचा "श्रीगणेशा" झाला आहे.**



राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या प्रकल्पाला हिरवा कंदील देत ७० एकर जागा उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. भाजपाचे आमदार महेश लांडगे यांचा हा "ड्रीम प्रोजेक्ट" आता दृष्टीक्षेपात आला आहे.

शहरातील मोशी येथील गट क्रमांक ३२५ मधील शासकीय गायरान जमिनीवर आयआयएमची शाखा उभारली जाणार आहे. यामुळे पिंपरी-चिंचवडच्या लौकिकात आणखी भर पडणार असून, औद्योगिक विकासाला नवी गती मिळणार आहे. याआधी त्यांनी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाची शाखा सुरू करण्यासाठी आमदार लांडगे पुढाकार घेतला होता आणि त्याला यश मिळाले. आता आयआयएम-नागपूरची शाखा सुरू करण्याचे स्वप्न साकार होत आहे.

औद्योगिक नगरीत आयआयएमची शाखा सुरू झाल्यास रोजगार, संशोधन आणि उद्योजकतेच्या नव्या संधी निर्माण होतील.

देशभरातील विद्यार्थी पिंपरी-चिंचवडमध्ये येतील, उद्योगजगताशी थेट संपर्क साधला जाईल आणि शहराची शैक्षणिक ताकद अधिक बळकट होईल, असा विश्वास आमदार लांडगे यांनी व्यक्त केला आहे.

> "पिंपरी-चिंचवड हे औद्योगिक शहर असून येथे देशाच्या कानाकोपऱ्यातील नागरिक वास्तव्यास आहेत. मुंबई-पुणे कनेक्टिव्हिटी, औद्योगिक विकास आणि शैक्षणिक वातावरण लक्षात घेता आयआयएमसारखी संस्था सुरू होणे हे शहरासाठी अभिमानास्पद आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठक घेतली होती. आता महसूल मंत्री यांनी जागेला मान्यता दिली आहे. IIM चे संचालक डॉ. भीमराय मेत्री यांनी पुढाकार घेतला आहे. आता 'आयआयएम' च्या कामाला आता गती मिळेल.
> **-महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# पिंपरी चिंचवडचे १० खेळाडू पात्र

## गोव्यातील पूर्व राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेसाठी अरूण पाडुळे स्पोर्ट्स फाउंडेशनच्या 10 नेमबाजांची निवड

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत कार्यरत अरुण पाडुळे स्पोर्ट्स प्रमोशन फाउंडेशनच्या नेमबाजी प्रशिक्षण केंद्रातील तब्बल १० खेळाडूंनी गोवा येथे होणाऱ्या पूर्व राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले असून, यामध्ये महेश पाडुळे यांनी रौप्य पदक पटकावून विशेष लक्ष वेधले आहे.**



स्वामी विवेकानंद क्रिडांगण, कृष्णानगर येथे मागील १० महिन्यांपासून सुरू असलेल्या या प्रशिक्षण केंद्राने अल्पावधीतच मोठी झेप घेतली आहे. नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय नेमबाजी स्पर्धा (शिव छत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी) तसेच कॅप्टन इजिकल स्पर्धा (मुंबई) यामध्ये खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. महाराष्ट्र रायफल असोसिएशनच्या वतीने आयोजित या स्पर्धांमध्ये फाउंडेशनच्या नेमबाजांनी आपले नेमबाजी कौशल्य सिद्ध केले.

पूर्व राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंमध्ये पुढील नेमबाजांचा समावेश आहे. श्रवण भगत, स्वरा जाधव, महेश पाडुळे (रौप्य पदक विजेता), अर्शद संदे, ज्ञानदा बुटे, साईराज गव्हाणे, सई मंडलिक, राजवीर साकोरे, प्रियांश मिर्धा. या उल्लेखनीय यशाचे श्रेय मुख्य प्रशिक्षक अरुण पाडुळे सर आणि प्रशिक्षिका भक्ती नारायणकर यांच्या मार्गदर्शनास दिले जात आहे. प्रशिक्षकद्वयीच्या सातत्यपूर्ण परिश्रमांमुळे अल्पावधीतच केंद्राने राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये आपला ठसा उमटवला आहे. ही निवड पिंपरी चिंचवड शहराच्या नेमबाजी इतिहासातील एक मैलाचा दगड मानली जात आहे, कारण याआधी एकाच वेळी इतक्या खेळाडूंनी पूर्व राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवलेली नव्हती. शहरात विविध स्तरांमधून खेळाडू व प्रशिक्षकांचे अभिनंदन होत असून, हे युवा नेमबाज भविष्यात राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली कामगिरी सिद्ध करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

### निवड झालेले खेळाडू

श्रवण भगत, स्वरा जाधव, महेश पाडुळे, अर्शद संदे, ज्ञानदा बुटे, साईराज गव्हाणे, सई मंडलिक, राजवीर साकोरे, प्रियांश मिर्धा

**१० महिन्यांत उल्लेखनीय प्रगती**


राज्यस्तरीय व कॅप्टन इजिकल स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी

प्रशिक्षक: अरुण पाडुळे सर व भक्ती नारायणकर



## भूमिका

# दलितांचा शिक्षणप्रश्न कायमच!



**आज एकंदरीतच भारतीय शिक्षण व्यवस्थेकडे पाहिले तर असा प्रश्न निर्माण होतो की, खरोखरच डॉ. राधाकृष्णन यांना अपेक्षित शिक्षण व्यवस्था आपण राबवत आहोत का?**

कारण प्राप्त परिस्थितीत गरीब व श्रीमंत विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिक्षणाच्या सोयीसुविधांत जमीन आस्मानचा फरक आहे. असे का? हे सत्य केवळ आजचेच आहे, असे नाही. ती पूर्वापार चालत आलेली एक प्रथाच आहे. ती पूर्वी वर्ण-जाती आधारित (कास्ट बेस) होती, आज आर्थिक मूल्याधारित (कॉस्ट बेस) झाली आहे. याला भारतातील विषमतावादी सभ्यता जबाबदार आहे. प्रदीर्घ काळ लोटला, मात्र त्यात काहीही बदल झाल्याचे दिसत नाही. बदल होतो तो फक्त विषमतावादी तत्वांचा वापर करण्याच्या पद्धतीत. वंश/ जात या निकषांवर एका व्यक्तीला कमी लेखणे आणि दुसऱ्याने मोठेपण मिरवणे ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे.प्राचीन काळापासून भारतीय उच्चवर्णीय समाजात इतरांच्या शैक्षणिक गरजांविषयी कुठलीही आस्था नव्हती. समाज विषमतेच्या तत्त्वाचा पुरस्कार करत आला. आज आपण राज्यघटनेवर आधारित समाजव्यवस्थेचे पालन करत असलो, तरीही राजकीय-सवर्णांच्या मूळप्रवृत्तीत अद्याप सकारात्मक बदल झालेला नाही, याचे कारणच आपली वर्ण/ जातिव्यवस्था हे आहे. अन्यथा मानवी मनात इतरांविषयी हीन भावना जन्माला आलीच नसती. या वर्णव्यवस्थेचे स्वरूप अगदी सुरुवातीला खुल्या समाजव्यवस्थेचा पुरस्कार करणारी असे असले तरी कालांतराने तिचा वापर बंदिस्त समाजव्यवस्था म्हणूनच आजतागायत करण्यात आला आहे. याचाच अर्थ असा की, विषमतावादी समाजरचनेचा पाया मजबूत करण्यातच उच्चवर्णीयांचा आनंद दडलेला आहे. याच माध्यमातून त्यांना आपल्या भौतिक विकास व सुखाची पूर्तता करण्याचे न संपणारे स्रोत प्राप्त होतात.युरोपीय तत्त्वज्ञ नित्शे यांनी अशाप्रकारच्या समाजाची भलामण केली असली तरी, अशी प्रवृत्ती मानवी विकासाला बाधकच आहे. अशाच वर्णव्यवस्थेतून जातीचे अस्तित्व पुढे आले व उच्च-नीच लोकसमूहामध्ये विषमतेची दरी अधिकाधिक रुंदावत गेली. म्हणून समताधिष्ठित समाजाची निर्मिती करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी आयुष्यभर लढा दिला, तरीही आज समाज-जीवनाचे चित्र फार विचित्र आहे. याचे कारणच त्यांना मिळणाऱ्या शैक्षणिक दर्जात दडलेले आहे. अर्थातच नवीन राज्यघटना निर्मित देशाच्या आर्थिक-सुबत्तेचा फायदा समाजातील इतर घटकांतील काहींना मिळालेला आहे.

ही प्रक्रिया मागील केवळ ५०-६० वर्षे सुरू राहिली. विसावे शतक संपते न संपते तोच येथील राजकीय उच्चवर्णीयांनी भारतीय शिक्षण पद्धतीमध्ये आर्थिक-मूल्यावर आधारित (कॉस्ट बेस) शिक्षण व्यवस्थेचा नवा अध्याय सुरू करून इतरांना पुन्हा परिघावरच आजन्म नाचवत ठेवण्याचे उद्योग सुरू केल्याचे दिसते. वर्ण/ जातीआधारित व आर्थिक-मूल्याधारित शिक्षण पद्धतीमध्ये काहीही फरक नाही. या सर्व प्रणालींचे मूळ तत्त्व एकच आहे. ते म्हणजे इतरांना येनकेन प्रकारे शिक्षण नाकारणे. जर निम्न दर्जाच्या जातीतील लोकांना यापूर्वी निम्न दर्जाच्याच शिक्षण सुविधा मिळाल्या तर आर्थिक स्तर निम्न असलेल्या विद्यार्थ्यांना निम्न दर्जाच्याच शैक्षणिक सुविधा मिळणार. कारण निम्न आर्थिक स्तर हा मुख्यत्वे निम्न दर्जाच्या जातींतील लोकांचाच आहे.

म्हणूनच या आर्थिक स्तरातील विद्यार्थ्यांना कसाबसा प्रवेश मिळाला तर त्यांच्या शिकण्याची पुढील प्रक्रिया आर्थिक ताणतणावाखाली खिळखिळी करत ठेवणे क्रमशः आलेच. आर्थिक-मूल्याधारित नवीन शिक्षणाच्या पद्धतीमध्ये केवळ उच्चवर्णीयांच्या शिक्षणाची सोय आहे. याचा दुसरा अर्थ असा की, दलितांना यापुढे उच्चदर्जाचे शिक्षण मिळणार नाही. म्हणजेच कालपर्यंत इतरांना वर्ण/जाती आधारित शिक्षणाचे मार्ग बंद करण्यात आले होते ते आताही तसेच बंद राहतील. म्हणूनच आर्थिक-मूल्यधारित तंत्राच्या वापरामध्ये पुन्हा इतरांना शिक्षण नाकारणे याच तत्त्वाचे पालन केल्याचे आढळून येते.

## प्रासंगिक »

### वार्ता विघ्नाची..?

***बुद्धिदात्याचा उत्सव निर्बुद्ध गोष्टींनी साजरा केल्याबद्दल बोलतात काही; त्यांना गोंगाट म्हणजे शांतता, झगझगाट म्हणजे अंधार, तुंबलेली वाहतूकच सुरक्षित... हे कळत कसे नाही?***

गणराया... आपले स्वागत असो. वेलकम. नेमचि येतो मग पावसाळा... हे सृष्टीचे कौतुक आम्हा मर्त्य मानवांस रस्त्यातील खड्डे, माती-पाणी चिखलाचा रबरबाट, डेंग्यू-चिकनगुन्या यांच्या साथी यामुळे अधिक जाणवते. बघता बघता आषाढ संपून श्रावण लागतो आणि मग तुमच्याइतकेच ज्याच्या बालरूपाचे कौतुक त्या कृष्णाच्या नावे होणारी हुल्लडबाजी आटोपली की मागोमाग तुमच्या येण्याची वर्दी मिळते. रस्त्यात वाहतुकीची कोंडी करून उभे राहणारे कारण थेट गणेश चतुर्थीलाच आपण यायचात. आता तितक्याने आमच्या भाईलोकांचे सॅटिसफॅक्शन होत नाही. म्हणून आधी हल्ली तुमच्या मंडपाच्या भूमिपूजनाचा (वास्तविक बेकायदा उभ्या केल्या जाणाऱ्या मंडपाचे भूमिपूजन म्हणजे अनौरस संततीच्या नामकरणास गावजेवण घालण्यासारखे असे काही म्हणतील.


**जागतिक पातळीवर वन्यजीव संवर्धनासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सुरू झाला आहे. त्यापाठोपाठ आता भारतातही वन्यजीव संवर्धनासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराला गती आली आहे.**

# वन्यजीव संवर्धनात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे योगदान

जगभरात अनेक ठिकाणी वन्यजीवांचे संवर्धन करण्याच्या प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा वापर 'गेम चेंजर' ठरत आहे. वन्यप्राण्यांची बेकायदेशीर शिकार, त्यांच्या अधिवासाचा नाश आणि मानव-वन्यजीव संघर्ष या आव्हानांना वनखात्यासह सर्वांनाच सामोरे जावे लागत आहे. तंत्रज्ञान या समस्यांचा सक्रिय सामना करण्यासाठी आणि त्यावर उपाय शोधण्यासाठी नवीन मार्ग दाखवते. वन्यजीव संवर्धनात तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण, प्रजातींचे, परिसंस्थांचे संरक्षण करण्यास आणि मानव आणि वन्यजीव यांच्यातील सहअस्तित्व वाढविण्यास मदत करते.

शिकार रोखण्यासाठी आणि लुप्तप्राय प्रजातींचे संरक्षण करण्यासाठी 'ड्रोन', 'नेटवर्क सेन्सर्स' आणि कृत्रिम तंत्रज्ञान अशा तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. वन्यजीव अधिवासांचे संरक्षण आणि जतन करण्यासाठी 'उपग्रह रिमोट सेन्सिंग' महत्त्वाचे ठरत आहे. मानव-वन्यजीव संघर्षावर आभासी कुंपण, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित भिंत, ड्रोन उपयोगी ठरत आहेत.

### शिकार रोखण्यासाठी तंत्रज्ञानाची मदत?




शिकार या वन्यजीवांसाठीच्या सततच्या धोक्याचा सामना करण्यासाठी, संवर्धनवादी 'नेटवर्क सेन्सर्स', 'ड्रोन' आणि कृत्रिम बुद्धिमता प्रणाली यासारख्या तंत्रज्ञानाचा वापर करत आहेत. 'थर्मल इमेजिंग'ने सुसज्ज असलेले ड्रोन रात्रीच्या वेळी शिकाऱ्यांच्या हालचाली ओळखू शकतात. 'नेटवर्क सेन्सर' धोक्यात असलेल्या प्राण्यांच्या ठिकाणांचा मागोवा घेतात आणि वनरक्षकांना संभाव्य धोक्यांपासून सावध करतात. कृत्रिम बुद्धिमत्ता कार्यप्रणाली या तपशिलाचे विश्लेषण करून शिकारीच्या धोकादायक जागांचा अंदाज लावते. त्यामुळे अधिकाऱ्यांना तिथे संसाधने तैनात करता येतात. तंत्रज्ञानावर आधारित या गोष्टींमुळे वन्यजीवांचे संरक्षण तर होतेच, शिवाय त्यांची शिकारही रोखली जाते.

### प्रगत तंत्रज्ञानातून अधिवासांचे जतन शक्य आहे का?

पर्यावरणीय प्रणालीचा नाश हा वन्यजीवांसाठी आणखी महत्त्वाचा धोका आहे. सध्या जगातील फक्त १५ टक्के जमीन संरक्षित आहे. 'उपग्रह रिमोट सेन्सिंग' मोठ्या प्रमाणात पर्यावरणीय देखरेख करू शकते. ज्यामुळे संवर्धनवाद्यांना जमिनीच्या वापरातील बदल, जंगलतोड दर आणि रस्ते आदी कारणांमुळे जंगलातील जमिनींचे अखंड पट्टे विखंडित होण्याबाबतची माहिती मिळते. संरक्षणाची आवश्यकता असलेल्या महत्त्वाच्या अधिवासांची ओळख पटविणे आणि निकृष्ट क्षेत्रे सुधारणे या उद्देशाने धोरणे विकसित करण्यासाठी हा तपशील आवश्यक आहे. याशिवाय, पर्यावरणीय डीएनए नमुना पद्धतीद्वारे एखाद्या परिसंस्थेत अस्तित्वात असलेल्या जीवजातींचे अनुवांशिक घटक ओळखून त्या ठिकाणच्या जैवविविधतेच्या पातळीबाबत माहिती मिळते. ही तंत्रज्ञान पद्धत संवर्धनकर्त्यांना उच्च जैवविविधता असलेल्या आणि तात्काळ संरक्षणाची गरज असलेल्या क्षेत्रांची ओळख पटविण्यास मदत करते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता महिलांच्या कामाच्या वेळा.. सुरक्षा सुविधांना प्राधान्य!

# राज्याची तिसरी कामगार संहिता मंजूर

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील कामगार कायद्यांमध्ये सुधारणा करून महाराष्ट्र कामगार संहिता नियम तयार करण्यात आले असून यापैकी महाराष्ट्र व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य आणि कार्यस्थळ संहिता नियमांच्या प्रारूपास केंद्र सरकारच्या सहमतीसाठी पाठविण्यास मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.केंद्राच्या कामगार कायद्यांना अनुरूप या संहिता तयार करण्यात येत आहेत. यामध्ये औद्योगिक सुरक्षेत विविध घटकांचा साकल्याने विचार करण्यात आला आहे. महिलांच्या कामांच्या वेळा, त्यांची सुरक्षा तसेच त्यांच्यासाठीच्या सुविधांचा समावेश करण्यात आला आहे.**

## अंमलबजावणीसाठी नियम तयार



राज्याच्या 'ईझ ऑफ बिझनेस डुईंग' धोरणामध्ये सुसंगतता येणार आहे. राज्यात गुंतवणूक वाढ व रोजगार संधीमध्ये वाढ होण्यास मदत होणार आहे, असा शासनाचा दावा आहे.केंद्र सरकारने १९९९ मध्ये रविंद्र वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली दुसरा श्रम आयोग नेमला होता. या आयोगाने सन २००२ मध्ये आपला अहवाल सादर केला. त्यामध्ये सर्व २९ कामगार कायदे एकत्रित करुन फक्त ४ कामगार संहिता तयार करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार केंद्र शासनाने २९ कामगार कायद्यातील तरतूदी एकत्रित करुन चार संहिता तयार केल्या आहेत.या ४ संहिता संसदेने अधिनियम म्हणून मंजूर केल्या असून त्यांना राष्ट्रपतींनी संमती दिली आहे. या संहितांच्या अंमलबजावणीसाठी सर्व राज्यांना संबंधित संहितांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने नियम तयार करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार महाराष्ट्र राज्याने तयार केलेल्या औद्योगिक संबंध व वेतन संहिता नियमांना यापुर्वीच मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.राज्यातील कामगार कायद्यांमध्ये सुधारणा करून महाराष्ट्र कामगार संहिता नियम तयार करण्यात आले असून यापैकी महाराष्ट्र व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य आणि कार्यस्थळ संहिता नियमांच्या प्रारूपास केंद्र सरकारच्या सहमतीसाठी पाठविण्यास मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. केंद्राच्या कामगार कायद्यांना अनुरूप या संहिता तयार करण्यात येत आहेत. यामध्ये औद्योगिक सुरक्षेत विविध घटकांचा साकल्याने विचार करण्यात आला आहे. महिलांच्या कामांच्या वेळा, त्यांची सुरक्षा

## रोजगार संधीमध्ये वाढ

राज्यात गुंतवणूक वाढ व रोजगार संधीमध्ये वाढ होण्यास मदत होणार आहे, असा शासनाचा दावा आहे.केंद्र सरकारने १९९९ मध्ये रविंद्र वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली दुसरा श्रम आयोग नेमला होता. या आयोगाने सन २००२ मध्ये आपला अहवाल सादर केला. त्यामध्ये सर्व २९ कामगार कायदे एकत्रित करुन फक्त ४ कामगार संहिता तयार करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार केंद्र शासनाने २९ कामगार कायद्यातील तरतूदी एकत्रित करुन चार संहिता तयार केल्या आहेत. या ४ संहिता संसदेने अधिनियम म्हणून मंजूर केल्या असून त्यांना राष्ट्रपतींनी संमती दिली आहे. या संहितांच्या अंमलबजावणीसाठी सर्व राज्यांना संबंधित संहितांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने नियम तयार करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

तसेच त्यांच्यासाठीच्या सुविधांचा समावेश करण्यात आला आहे. या नव्या नियमांमुळे राज्याच्या 'ईझ ऑफ बिझनेस डुईंग' धोरणामध्ये सुसंगतता येणार आहे. राज्यात गुंतवणूक वाढ व रोजगार संधीमध्ये वाढ होण्यास मदत होणार आहे, असा शासनाचा दावा आहे.केंद्र सरकारने १९९९ मध्ये रविंद्र वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली दुसरा श्रम आयोग नेमला होता. या आयोगाने सन २००२ मध्ये आपला अहवाल सादर केला. त्यामध्ये सर्व २९ कामगार कायदे एकत्रित करुन फक्त ४ कामगार संहिता तयार करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार केंद्र शासनाने २९ कामगार कायद्यातील तरतूदी एकत्रित करुन चार संहिता तयार केल्या आहेत.या ४ संहिता संसदेने अधिनियम म्हणून मंजूर केल्या असून त्यांना राष्ट्रपतींनी संमती दिली आहे. या संहितांच्या अंमलबजावणीसाठी सर्व राज्यांना संबंधित संहितांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने नियम तयार करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार महाराष्ट्र राज्याने तयार केलेल्या औद्योगिक संबंध व वेतन संहिता नियमांना यापुर्वीच मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

# कोकणात जाण्यास रो-रो सेवेचा पर्याय

## तीन तासात रत्नागिरी, पाच तासात सिंधुदुर्ग : मंत्री नितेश राणे

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**गणेशोत्सव, होळी अशा विविध सणांनिमित्त कोकणवासीयांना गावी जाण्यासाठी आता समुद्रमार्गे रो रो सेवेचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. यासाठी राज्य शासनाने मुंबई ते (जयगड) रत्नागिरी आणि मुंबई ते (विजयदुर्ग) सिंधुदुर्ग रो-रो सेवा सुरू केली असल्याची माहिती मत्स्यव्यवसाय, बंदरेमंत्री नितेश राणे यांनी दिली.**




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून मुंबई ते कोकण समुद्रमार्गे प्रवास करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या रो-रो सेवेची माहिती नितेश राणे यांनी दिली. केंद्रीय शिपींग मंत्रालय आणि राज्याच्या बंदरे विभागाने या जलवाहतूक सेवेस अंतिम मंजुरी दिली आहे. या रो-रो सेवेसाठी अत्यावश्यक असणाऱ्या एकूण १४७ परवानग्या प्राप्त झाल्या असून, यामुळे कोकणवासीयांचा प्रवास अतिशय सुरक्षित व जलद होणार आहे. हवामानाच्या बदलामुळे मच्छीमारांनाही समुद्रात जाण्यासाठी सतर्कतेचा इशारा देण्यात आला असल्याने हवामान

## आसनक्षमतेप्रमाणे दर वाढ

.इकोनॉमी क्लाससाठी दोन हजार ५०० रूपये दर आकारला जाणार आहे. तर, प्रिमियम इकोनॉमीसाठी प्रवाशांसाठी चार हजार रूपये, बिझनेस क्लाससाठी सात हजार ५००, तसेच, चार चाकीसाठी ६ हजार रुपये, दु-चाकीसाठी एक हजार रुपये, सायकलसाठी ६०० रुपये, मिनी बससाठी १३ हजार रुपये आणि बसच्या आसनक्षमतेप्रमाणे दर वाढत जाणार आहेत.

सुरळीत होताच प्रवाशांसाठी ही रो-रो सेवा १ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे.भाऊचा धक्का ते जयगड तीन तास तर भाऊचा धक्का ते विजयदुर्ग पाच तासांचा प्रवास असेल. येथे जेट्टीची सुविधा असून, जेट्टीवरून शहरात जाण्यासाठी बसेसची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. २५ नॉट्स स्पीडची ही 'एम टू एम' नावाची रो-रो बोट असणार आहे जी दक्षिण आशियातील वेगवान बोट आहे. यामध्ये इकोनॉमी वर्गात ५५२ आसनांची व्यवस्था, प्रीमियम इकोनॉमीमध्ये ४४, बिझनेसमध्ये ४८, तर प्रथम दर्जामध्ये १२ प्रवाशांची क्षमता असणार आहे

‘स्वदेशी’ जागर

## पंतप्रधान नरेंद्र मोदीकडून ‘स्वदेशी’चा जागर

# उत्पादन देशांतर्गतच होणे आवश्यक!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी २५ टक्के अतिरिक्त आयात शुल्क लागू करण्याच्या एक दिवस आधीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी ‘स्वदेशी’ आणि ‘मेक इन इंडिया’चा जोरदार प्रचार केला. यामुळे देशात अधिकाधिक रोजगार निर्माण होण्यास मदत होईल, असे ते म्हणाले. तसेच ‘स्वदेशी’ हा प्रत्येकाचा जीवनमंत्र असला पाहिजे आणि कोणीही गुंतवणूक करत असले तरी, उत्पादन देशांतर्गतच झाले पाहिजे, असेही पंतप्रधान मोदी यांनी या वेळी सांगितले.**

## ‘मेक इन इंडिया’चा जोरदार प्रचार



गुजरातमधील हंसलपूर येथील केंद्रातून १०० हून अधिक देशांमध्ये ‘मारुती सुझुकी’च्या पहिल्या इलेक्ट्रिक गाडीच्या (ई-विटारा) निर्यातीला मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवण्यात आला. तसेच हायब्रिड इलेक्ट्रिक वाहनांसाठी लिथियम-आयन बॅटरी, विद्युतघट (सेल) आणि विद्धुताग्र (इलेक्ट्रोड) उत्पादन केंद्राचे उद्घाटनही पंतप्रधानांच्या हस्ते झाले.

या वेळी ते बोलत होते. भारत-जपान संबंधांचे कौतुक करताना दोन्ही देश एकमेकांसाठी बनले आहेत, असे मोदी या वेळी म्हणाले.केंद्र सरकारच्या ‘मेक इन इंडिया’ उपक्रमाने जागतिक आणि देशांतर्गत उत्पादकांसाठी अनुकूल वातावरण तयार झाले आहे. जगात आता भारतात उत्पादित झालेल्या इलेक्ट्रिक गाड्या चालवल्या जातील, असे पंतप्रधान मोदींनी सांगितले. ‘माझी स्वदेशीची व्याख्या अतिशय सोपी आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मागच्या काही महिन्यांत अनेक मोठे निर्णय घेतले आहेत.

ट्रम्प यांच्या धोरणांमध्ये प्रामुख्याने टॅरिफच्या निर्णयाची मोठी चर्चा झाली अर्थात अद्यापही सुरू आहे. आतापर्यंत डोनाल्ड ट्रम्प यांनी जगातील अनेक देशांवर मोठ्या प्रमाणात टॅरिफ लादलं. त्याचा अनेक देशांना मोठा आर्थिक फटका बसला. ट्रम्प यांनी भारतावर देखील २५ टक्के टॅरिफ लादलं. तसेच अतिरिक्त २५ टक्के टॅरिफ लादण्याची घोषणा ६ ऑगस्ट रोजी केली. त्यानुसार २७ ऑगस्टच्या मध्यरात्रीपासून हे अतिरिक्त आयातशुल्क भारतावर लागू होणार आहे.

या संदर्भात अमेरिकेच्या होमलॅण्ड सिक्योरिटी विभागाने नोटीसही जारी केली आहे. भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्याच्या कारणावरून डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर अतिरिक्त आयात शुल्क लादलं आहे. ट्रम्प यांच्या या आयात शुल्कामुळे भारत आणि अमेरिकामधील संबंधांमध्ये काहीसा तणाव निर्माण झाल्याचं चित्र आहे. भारताने रशियाकडून तेल खरेदी करू नये यासाठी ट्रम्प सातत्याने भारतावर दबाव आणण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, भारताने आपली ठाम भूमिका घेतली असून भारत अमेरिकेच्या दबावापुढे झुकत नाहीये. या सर्व घडामोडी जवळपास दोन महिन्यांपासून सुरू आहेत.: पैसे कोणाचे गुंतवले आहेत हे महत्त्वाचे नाही, ते डॉलर्स आहेत, पौंड आहेत, चलन काळे आहे की पांढरे आहे, हेही माझ्यासाठी महत्त्वाचे नाही. उत्पादनात घाम माझ्या देशवासीयांचा आहे हे महत्त्वाचे आहे. पैसा दुसऱ्याचा असू शकतो, पण घाम आपला आहे,’ असे मोदींनी ठामपणे सांगितले.

२०४७ पर्यंत आपण असा भारत निर्माण करू की तुमच्या भावी पिढ्यांना तुमच्या बलिदानाचा अभिमान वाटेल. तुमच्या योगदानाचा अभिमान वाटेल. पुढील पाच ते सहा वर्षांत भारतामध्ये ७० हजार कोटींची गुंतवणूक करण्याचे आश्वासन, सुझुकी मोटर कॉर्पोरेशनचे प्रतिनिधी संचालक आणि अध्यक्ष तोशिहिरो सुझुकी दिले. तर ही गुंतवणूक कंपनीचे वार्षिक ४० लाख वाहन निर्मितीचे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी असेल, असे मारुती सुझुकी इंडियाचे अध्यक्ष आर. सी. भार्गव म्हणाले.

### इलेक्ट्रोड उत्पादन केंद्राचे उद्घाटन

केंद्रातून १०० हून अधिक देशांमध्ये ‘मारुती सुझुकी’च्या पहिल्या इलेक्ट्रिक गाडीच्या (ई-विटारा) निर्यातीला मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवण्यात आला. तसेच हायब्रिड इलेक्ट्रिक वाहनांसाठी लिथियम-आयन बॅटरी, विद्युतघट (सेल) आणि विद्धुताग्र (इलेक्ट्रोड) उत्पादन केंद्राचे उद्घाटनही पंतप्रधानांच्या हस्ते झाले.

# मतदानाच्या अधिकाराचे रक्षण आवश्यक

## लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे प्रतिपादन

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बिहारमध्ये मतदार यादीच्या सुरू असलेल्या ‘विशेष सखोल फेरतपासणी’वरून (एसआयआर) केंद्रातील ‘रालोआ’ सरकारवर थेट हल्ला चढवत, संविधानाचे रक्षण करण्यासाठी आता नागरिकांनीच त्यांच्या मतदानाच्या अधिकाराचे रक्षण केले पाहिजे, असे आवाहन काँग्रेस नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मंगळवारी केले.**



बिहारमधील ‘एसआयआर’मुळे भाजप आणि निवडणूक आयोगाचा बनाव उघड होत आहे. म्हणूनच नागरिकही आता भाजप नेत्यांना ‘मतदार चोर’ म्हणू लागले आहेत, असा दावाही त्यांनी केला.काँग्रेसच्या ‘मतदार अधिकार यात्रे’चा भाग म्हणून मधुबनी जिल्ह्यात एका जाहीर सभेला संबोधित करताना राहुल गांधी बोलत होते. भाजप नेते निवडणूक आयोगाच्या मदतीने मतचोरी करीत आहेत. म्हणूनच नागरिकांनी त्यांच्या मतदानाच्या अधिकाराचे आणि संविधानाचे रक्षण करण्यासाठी आता पुढे येणे आवश्यक आहे, असे राहुल गांधी या वेळी म्हणाले. निवडणूक आयोगाने बिहारमधील मतदार याद्यांमधील ६५ लाख नावे वगळली आहेत आणि आता भाजपला मदत करण्यासाठी नव्याने ६५ लाख नावे नव्याने मतदार यादीत जोडली जातील, असा दावा राहुल यांनी केला.‘केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले होते की, भाजप सरकार आणखी ४०-५० वर्षे टिकेल. आता मला समजले की त्यांनी ते सांगितले कारण ते ‘मत चोरी’मध्ये सहभागी आहेत आणि त्याची सुरुवात गुजरातमधूनच झाली,’ आरोपावर पंतप्रधान नरेंद्र मोदी किंवा अमित शहा यांनी एकही शब्द उच्चारला नाही.

### मतदान चोर म्हणू लागले

भारताची राज्यघटना सर्वांना समान अधिकार देते. त्यामुळेच संघ राज्यघटनेचा आदर करत नाही, असा आरोपही राहुल यांनी केला.बिहारमधील ‘एसआयआर’मुळे भाजप आणि निवडणूक आयोगाचा बनाव उघड होत आहे. म्हणूनच नागरिकही आता भाजप नेत्यांना ‘मतदान चोर’ म्हणू लागले आहेत, असा दावाही त्यांनी केला.

**हिंदू धर्मात गणेशाला बुद्धीची, ज्ञानाची देवता मानतात. सर्व शुभ कार्यात प्रथम गणपतीची पूजा करतात. कारण तो सुखकर्ता, दुःखहर्ता, विघ्नहर्ता आहे. या गणेश चतुर्थीचा इतिहास, आपण गणेश चतुर्थी का साजरी करतो? याचे महत्त्व, त्याचप्रमाणे गणेश चतुर्थी कशाप्रकारे साजरी केली जाते? याबाबतची सगळी माहिती महाईन्यूजच्या माध्यमातून आपल्यापर्यंत घेऊन आलो आहोत.**

## गणेश चतुर्थीचा इतिहास

» स्कंदपुराण, नारद पुराण, त्याचप्रमाणे याज्ञवल्क्य स्मृती, महाभारत यांसारख्या ग्रंथांमध्ये गणपतीचा उल्लेख आढळून येतो. पाचव्या आणि आठव्या शतकामध्ये एलोरा लेण्यांसारख्या हिंदू, बौद्ध, जैन मंदिरांमध्ये केलेल्या कोरीव कामांमध्ये गणेशाच्या मूर्ती विराजमान असल्याचे दिसून येते. गणेश चतुर्थीचा उगम हा प्राचीन काळापासून आहे. परंतु सतराव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात या गणेश चतुर्थीला महत्त्व प्राप्त झाले.

## चतुर्थीला चंद्र का बघू नये ?


» गणेश चतुर्थीच्या दिवशी रात्री चंद्र दर्शन करू नये. यासाठी फार पूर्वीपासून एक कथा सांगितली जाते. एके दिवशी आपले लाडके बाप्पा श्री गणेश मूषकावर बसून मोठ्या लगबगिने कुठेतरी जात होते. तेव्हा त्या गडबडीत असताना ते घसरले आणि पडले. त्यांना पडलेले पाहून चंद्र जोरात हसू लागला. त्यामुळे गणपती बाप्पाला राग आला. आणि त्याने चंद्राला शाप दिला. बाप्पा म्हणाला, आजपासून तुझं तोंड कोणीही पाहणार नाही. जो तुझे तोंड पाहिलं, त्याच्यावर चोरीचा खोटा आळ येईल. गणपती बाप्पाच्या या बोलण्यामुळे चंद्र मात्र चांगलाच घाबरला आणि गणपती बाप्पाला प्रसन्न करून घेण्यासाठी त्यांनी मोठमोठे तप सुरू केले.

## हरतालिका पूजा व्रतकथा

» चंद्राच्या या भक्तीने गणपती बाप्पा देखील प्रसन्न झाले. आणि त्यांनी चंद्राला उःशाप दिला की, फक्त गणेश चतुर्थीच्या दिवशी तुझा तोंड कोणीही पाहणार नाही. त्यानंतर चंद्राने गणपती बाप्पाकडे विनंती केली की, जर एखाद्याने चुकून त्या दिवशी माझे दर्शन घेतले तर त्यांनी काय करावे माझ्या चुकीची शिक्षा एखाद्या निष्पाप व्यक्तीला व्हायला नको. यावर बाप्पाने सांगितले की, संकष्टी चतुर्थी व्रत केल्यास त्या व्यक्तीची खोट्या आळातून मुक्तता होईल. म्हणून या दिवशी कोणीही चंद्र दर्शन करत नाही.

## गणेश चतुर्थी का महत्वाची आहे ?

» हिंदू कॅलेंडरमधील एक महत्त्वाचा सण म्हणून गणेश चतुर्थीला पाहिले जाते. हा उत्सव संपूर्ण भारतभर मोठ्या उत्साहाने भक्तीने आनंदाने साजरा केला जातो. या सणाला अनेक कारणांमुळे महत्त्व प्राप्त होते. हा सण भारतीय संस्कृती, वारसा आणि विविधतेचा उत्सव आहे. त्यामुळे सांस्कृतिकदृष्ट्या, सामाजिक दृष्ट्या, पर्यावरणाच्यादृष्टीने आणि मुख्यतः आर्थिकदृष्टीने हा सण महत्त्वाचा समजला जातो.



**1** गणेश चतुर्थी ही काही ठिकाणी दीड दिवस, पाच दिवस, सात दिवस, दहा दिवस अशाप्रकारे साजरी केली जाते. संपूर्ण भारतामध्ये, त्याचप्रमाणे परदेशातही ज्या ठिकाणी भारतीय राहतात त्याठिकाणी मोठ्या आवडीने हा सण साजरा केला जातो. सामाजिक एकोपा राहण्यासाठी लोकमान्य टिळकांनी गणेश चतुर्थीच्या दिवशी सर्व घरांमध्ये आणि त्याचप्रमाणे सार्वजनिक ठिकाणी श्री गणेशाच्या मूर्तीची स्थापना केली. हा गणेशोत्सव भाद्रपद महिन्यामध्ये दरवर्षी साजरा केला जातो. त्यासाठी मोठ्या मोठ्या शहरांमध्ये ठिकठिकाणी गणेश मंडळांची स्थापना केली जाते. सार्वजनिक गणेशोत्सवामध्ये देखील दररोज सकाळी आणि संध्याकाळी गणेशाची पूजा आणि आरती केली जाते. तसेच नैवेद्य दाखवून प्रसादाचे देखील वाटप करण्यात येते. या उत्सव प्रसंगी अनेक गणेश मंडळामध्ये विविध प्रकारच्या स्पर्धा घेतल्या जातात. तसेच या सार्वजनिक गणेशोत्सवाचे देखावे पाहण्यासाठी लोकांची गर्दी जमलेली पहावयास मिळते. या निमित्ताने समाजातील लोक एकत्र येतात आणि आपल्यातील मतभेद दूर करून हा सण उत्साहाने आणि आनंदाने साजरा करतात.

**2** आपला भारत देश हा संस्कृती धार्मिक परंपरा जपणारा देश आहे. या देशांमध्ये साजरे होणारे प्रत्येक सण, उत्सव मोठ्या उत्साहाने आनंदाने आणि एकत्र येऊन साजरे केले जातात. गणेश चतुर्थी हा भारतातील एक महत्त्वाचा असा सण आहे, जो विविधता आणि सांस्कृतिक वारसाचे प्रतिनिधित्व करतो. संपूर्ण देशभरात विशेष करून महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तामिळनाडू यांसारख्या राज्यांमध्ये हा सण मोठ्या उत्साहात, आनंदात साजरा केला जातो. या उत्सवामुळे लोकांना एकत्र येण्यासाठी, त्याचप्रमाणे परंपरा साजरी करण्यासाठी, तसेच सांस्कृतिक पद्धत अवलंबण्यासाठी एक व्यासपीठ मिळते.

**3** या उत्सवाच्या शेवटच्या दिवशी श्री गणेशाच्या मूर्तीचे विसर्जन पाण्यामध्ये करण्यात येते. परंतु गेल्या काही वर्षांमध्ये पाण्यामध्ये न विरघळणाऱ्या पदार्थांचा वापर करून गणपतीच्या मूर्ती केल्या जातात. यामुळे पर्यावरणावर त्याचा विपरीत परिणाम घडून येत आहे. याला आळा घालण्यासाठी, पर्यावरणाचे महत्त्व लक्षात घेऊन तसेच पर्यावरण पूरक उत्सवांना चालना देण्यासाठी अनेक संस्था कार्यरत आहेत. त्यामुळे नैसर्गिक साहित्यापासून म्हणजेच माती, कागद यापासून बनवलेल्या गणेशाच्या मूर्ती उदयास येत आहे. यामुळे या मूर्तींचे पाण्यामध्ये विघटन होऊन पर्यावरणातील कुठल्याही जीवांना हानी होत नाही.

**4** गणेशोत्सवाला ज्याप्रमाणे संस्कृती, सामाजिक आणि पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्व आहे, त्याचप्रमाणे आर्थिक दृष्ट्या सुद्धा महत्त्व आहे. हा सण साजरा करण्यासाठी सणाला लागणाऱ्या सजावटीच्या, मिठाईच्या तसेच खाण्याच्या वस्तू खरेदी करण्यासाठी लोक बाजारपेठेमध्ये येत असतात. त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. येथील कारागीर, सजावटकार, व्यापारी लोकांना यामुळे रोजगार निर्माण होतो. पुराण कथेनुसार माता-पार्वतीचा पुत्र भगवान गणेश याचा जन्म भाद्रपद चतुर्थीला झाला होता. म्हणून आपण गणेश चतुर्थी हा सण साजरा करतो. भगवान शंकर आणि पार्वती पुत्र गणपती बुद्धीची देवता आहे. हिंदू धर्मात भगवान श्री गणेशाला प्रथम पूजेचा मान असतो

# वेळ का बाप्पा!

पार्वती देवीला स्नानासाठी जावयाचे होते. पण आसपास लक्ष ठेवण्याकरता कोणीच नव्हते. तेव्हा पार्वती देवीने आपल्या अंगावरील मळाने एक मूर्ती बनवली आणि ती जिवंत केली. या मूर्तीला पहारेकरी नेमलं आणि सांगितलं की, कोणालाही आतमध्ये येऊ देऊ नकोस. असे सांगून पार्वतीमाता स्नानासाठी आत गेली. भगवान शंकर काही वेळाने तिथे आले आणि ते आत जाऊ लागले. तोच त्या पहारेकऱ्याने त्यांना अडवले. त्यावर भगवान शंकर संतप्त झाले आणि त्यांनी त्या पहारेकऱ्याचं शिर धडावेगळं केलं. पार्वतीदेवी जेव्हा स्नान करून बाहेर आली तेव्हा त्यांनी हा प्रकार पाहिला आणि त्या संतापल्या. ते धडावेगळं शिर पाहून तिने पूर्ण ब्रम्हांड हादरवून सोडलं. सर्व देव अगदी ब्रम्हदेवापासून सगळे देव पार्वतीची समजूत घालण्याचा प्रयत्न करतात. पण पार्वती कोणाचं काहीही ऐकून घेत नाही. तेव्हा शंकर देव आपल्या गणाला आदेश देतात की, पृथ्वीतलावर जाऊन सर्वात आधी जो प्राणी दिसेल त्याचं शिर कापून घेऊन ये. गण बाहेर पडल्यावर सर्वात आधी त्याला हत्ती दिसला. तो त्याचं शिर घेऊन आला. भगवान शंकरांनी ते शिर पुतळ्याला लावले आणि त्या मूर्तीला जिवंत केले. हा पार्वतीचा मानस पुत्र गज (हत्ती) आनन (मुख) म्हणजेच गजानन होय. शंकर देवाने त्याला गणाचा ईश म्हणेज देव म्हणून गणेश नाव ठेवलं. हा दिवस चतुर्थीचा होता. त्यामुळे चतुर्थीला गणेश चतुर्थी म्हणून महत्त्व आहे. त्यामुळे तुम्हाला गणेश चतुर्थी ची माहिती मराठीत असणं आवश्यक आहे.



## माजी खेळाडूचा आरोप रोहितला संघाबाहेर करण्यासाठी गंभीरने आखला प्लॅन?

# संघाबाहेर करण्यासाठीचा कट!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय मुख्य प्रशिक्षक आणि संघ व्यवस्थापकांनी मोठा निर्णय घेतला आहे. आधी यो-यो टेस्टद्वार खेळाडूंची फिटनेस चाचणी घेतली जायची. मात्र ,आता मोठा बदल करण्यात आला आहे. इथून पुढे यो-यो टेस्टऐवजी ब्राँको चाचणी घेतली जाणार आहे. फुटबॉल आणि रग्बीसारख्या खेळांमध्ये खेळाडूंची फिटनेस तपासण्यासाठी ही चाचणी घेतली जाते. आता ब्राँको चाचणी अनिवार्य केल्यानंतर भारताचा माजी खेळाडू मनोज तिवारीने मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरवर मोठे आरोप केले आहेत. गौतम गंभीरला रोहित शर्मा भारतीय वनडे संघात नको आहे. त्याने २०२७ वर्ल्डकपआधीच रोहितला बाहेर करण्यासाठी ब्राँको चाचणी लागू केली आहे, असा आरोप मनोज तिवारीने केला आहे.**

### पुन्हा एकदा वादाची ठिणगी पेटली



मनोज तिवारी म्हणाला, ” मला तरी हेच वाटतं की, ते विराट कोहलीला वनडे वर्ल्डकप २०२७ स्पर्धेच्या प्लॅनमधून बाहेर करू शकत नाहीत. पण मला शंका आहे की, ते रोहित शर्माला या प्लॅनचा भाग ठेवणार नाहीत . कारण, मी क्रिकेटमध्ये काय सुरू आहे, याचा बारकाईने अभ्यास करणारा आहे. काही दिवसांपूर्वी लागू करण्यात आलेली ब्राँको टेस्ट ही रोहित शर्मासारख्या खेळाडूंसाठीच आहे. माझ्या मते, ज्यांना ते भविष्यात संघाचा भाग नको आहेत अशा खेळाडूंसाठी ही टेस्ट आणली गेली आहे.”तसेच तो पुढे म्हणाला की, “ब्राँको चाचणी ही सर्वात कठीण फिटनेस चाचणी ठरणार आहे. पण एकच प्रश्न उपस्थित होतोय तो म्हणजे , आत्ताच का? नव्या मुख्य प्रशिक्षकाला पहिल्या मालिकेपासून जबाबदारी देण्यात आली, तेव्हाच का लागू करण्यात आली नाही? ही कल्पना कोणी दिली? ही चाचणी कोणी आणली? काही दिवसांपूर्वी ब्राँको चाचणी का लागू करण्यात आली नाही? हे असे प्रश्न आहेत ज्यांची उत्तरं माझ्याकडे नाहीत. पण माझं निरीक्षण असं सांगतं की, रोहितने आपल्या फिटनेसवर मेहनत घेतली नाही, तर मार्ग आणखी खडतर होईल.”रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली खेळताना भारतीय संघाने आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेत जेतेपदाला गवसणी घातली. त्याआधी आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२४ स्पर्धेतही विजय मिळवून दिला होता. मात्र, ही स्पर्धा झाल्यानंतर रोहितने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली होती. इंग्लंड दौऱ्याआधी त्याने कसोटी

### गौतमवर गंभीर आरोप

तर मार्ग आणखी खडतर होईल.”रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली खेळताना भारतीय संघाने आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेत जेतेपदाला गवसणी घातली. त्याआधी आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२४ स्पर्धेतही विजय मिळवून दिला होता. मात्र, ही स्पर्धा झाल्यानंतर रोहितने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली होती.

क्रिकेटलाही रामराम केलं. त्यामुळे तो आता केवळ वनडे क्रिकेट खेळताना दिसून येणार आहे. दरम्यान रोहितला वनडे वर्ल्डकप २०२७ स्पर्धा खेळून निवृत्त व्हायचं आहे, असं म्हटलं जात आहे. तर काही वृत्तांमध्ये असा दावा करण्यात आला आहे की, ऑक्टोबरमध्ये ऑस्ट्रेलियाविरूद्ध होणाऱ्या वनडे मालिकेनंतर रोहित निवृत्तीची घोषणा करू शकतो. मनोज तिवारी म्हणाला, ” मला तरी हेच वाटतं की, ते विराट कोहलीला वनडे वर्ल्डकप २०२७ स्पर्धेच्या प्लॅनमधून बाहेर करू शकत नाहीत. पण मला शंका आहे की, ते रोहित शर्माला या प्लॅनचा भाग ठेवणार नाहीत . कारण, मी क्रिकेटमध्ये काय सुरू आहे, याचा बारकाईने अभ्यास करणारा आहे. काही दिवसांपूर्वी लागू करण्यात आलेली ब्राँको टेस्ट ही रोहित शर्मासारख्या खेळाडूंसाठीच आहे. माझ्या मते, ज्यांना ते भविष्यात संघाचा भाग नको आहेत अशा खेळाडूंसाठी ही टेस्ट आणली गेली आहे.”तसेच तो पुढे म्हणाला की, “ब्राँको चाचणी ही सर्वात कठीण फिटनेस चाचणी ठरणार आहे. पण एकच प्रश्न उपस्थित होतोय तो म्हणजे , आत्ताच का? नव्या मुख्य प्रशिक्षकाला पहिल्या मालिकेपासून जबाबदारी देण्यात आली, तेव्हाच का लागू करण्यात आली नाही? चाचणी कोणी आणली? काही दिवसांपूर्वी ब्राँको चाचणी का लागू करण्यात आली नाही? हे असे प्रश्न आहेत ज्यांची उत्तरं माझ्याकडे नाहीत. पण माझं निरीक्षण असं सांगतं की, रोहितने आपल्या फिटनेसवर मेहनत घेतली नाही.

# भारताला दोन्ही सामन्यात हरवू

## पाकिस्तानचा गोलंदाज हारिस रौफने टीम इंडियाला दिला इशारा

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आशिया चषक २०२५ स्पर्धेचा थरार येत्या ९ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. स्पर्धेतील पहिल्या लढतीत अफगाणिस्तान आणि हाँगकाँग हे दोन्ही संघ भिडणार आहेत. तर सर्व क्रिकेट चाहते ज्या सामन्याची आतुरतेने वाट पाहत आहेत, तो भारत- पाकिस्तान सामना १४ सप्टेंबरला रंगणार आहे. दोन्ही संघ एकमेकांविरूद्ध खेळताना विजय मिळवण्यासाठी पूर्ण जोर लावतात.**



आगामी आशिया चषकासाठी दोन्ही संघांचा एकाच गटात समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे दोन्ही संघ कमीत कमी २ वेळा आणि अंतिम फेरीत प्रवेश केला, तर ३ वेळा आमनेसामने येऊ शकतात. या स्पर्धेला सुरूवात होण्याआधी पाकिस्तानचा गोलंदाज हारिस रौफचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होऊ लागला आहे.

भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांमध्ये झालेल्या टी-२० सामन्यांमध्ये भारतीय संघ नेहमीच वरचढ राहिला आहे. पण हारिस रौफला वाटतंय की,

### जबाबदारी सूर्यकुमार यादवकडे

संघाच्या उपकर्णधारपदाची जबाबदारी शुबमन गिलकडे सोपवण्यात आली आहे. मात्र, या संघात श्रेयस अय्यरला स्थान देण्यात आलेलं नाही. तर दुसरीकडे पाकिस्तान संघाची जबाबदारी सलमानकडे सोपवण्यात आली आहे. दरम्यान संघातील सर्वात अनुभवी फलंदाज बाबर आझम आणि मोहम्मद रिझवानला या स्पर्धेसाठी पाकिस्तानच्या संघात स्थान देण्यात आलेलं नाही.

आगामी आशिया चषकातील दोन्ही सामन्यांमध्ये पाकिस्तानचा संघ भारतीय संघाला पराभूत करेल. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये तुम्ही पाहू शकता की, एका चाहत्याने त्याला भारतीय संघाविरूद्ध होणाऱ्या सामन्याबद्दल प्रश्न विचारला. या प्रश्नाचं उत्तर देताना हारिस रौफ म्हणाला, ” दोन्ही आपलेच आहेत, इंशाअल्लाह...”, हारिस रौफच्या मते, पाकिस्तानचा संघ दोन्ही सामने सहज जिंकेल. हा व्हिडीओ व्हायरल होताच नेटकऱ्यांनी हारिस रौफची फिरकी घ्यायला सुरूवात केली आहे.या स्पर्धेसाठी भारत आणि पाकिस्तान दोन्ही संघांची घोषणा करण्यात आली आहे.

॥ वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ निर्विघ्नं कुरुमेदेवः सर्वकार्येषु सर्वदा ॥

स्मार्ट PCMC SMART CITY

# महा ई न्यूज ™

ePaper

epaper.mahaenews.com

। बुधवार । दि. 27 ऑगस्ट 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती






सर्व नागरिकांना
गणेशोत्सव
निमित्त
हार्दिक शुभेच्छा!!
"वक्रतुंड महाकाय सूर्यकोटि समप्रभ। निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा।।"
आरतीताई सुरेश चौंधे
मा.नगरसेविका पिं.चिं.मनपा
संकेत सुरेश चौंधे
मा.अध्यक्ष BJYM पिंपरी चिंचवड शहर
निवडणूक संयोजक, चिंचवड विधानसभा

स्मार्ट PCMC SMART CITY
॥ वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ निर्विघ्नं कुरुमेदेवः सर्वकार्येषु सर्वदा ॥
महा न्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। बुधवार । दि. 27 ऑगस्ट 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



स्मार्ट PCMC
SMART CITY

॥ वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ निर्विघ्नं कुरुमेदेव: सर्वकार्येषु सर्वदा ॥

महान्यूज ™

ePaper

epaper.mahaenews.com

। बुधवार । दि. 27 ऑगस्ट 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



स्मार्ट PCMC SMART CITY
॥ वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ निर्विघ्नं कुरुमेदेवः सर्वकार्येषु सर्वदा ॥
महा न्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। बुधवार । दि. 27 ऑगस्ट 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



॥ वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ निर्विघ्नं कुरुमेदेवः सर्वकार्येषु सर्वदा ॥
# महान्यूज
epaper.mahaenews.com
। बुधवार । दि. 27 ऑगस्ट 2025।
ePaper
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
। सोमवार ।
। दि. 25 ऑगस्ट 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## विसर्जन घाटांची पाहणी केल्यानंतर आयुक्त शेखर सिंह यांची सूचना

# पीओपी व शाडू मातीच्या मूर्तींची नोंद ठेवा!

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भाविकांना गैरसोय होऊ नये म्हणून निर्देश

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी आज सकाळी मोशी खाणीसह शहरातील प्रमुख गणेश विसर्जन घाटांची पाहणी केली. विसर्जनाच्या दिवशी भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी विसर्जन घाटांवर आवश्यक सोयीसुविधांसह पुरेशी सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात यावी, असे निर्देशही आयुक्त सिंह यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. विशेष म्हणजे पीओपी व शाडू मातीच्या मूर्तींची नोंद ठेवा असेही आयुक्त शेखर सिंह यांनी स्पष्ट केले आहे.**



या पाहणी दौऱ्यावेळी महापालिकेचे शहर अभियंता मकरंद निकम, सहआयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सहशहर अभियंता देवन्ना गट्टूवार, उपायुक्त अण्णा बोदडे, सचिन पवार, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, अजिंक्य येळे, क्षेत्रीय अधिकारी किशोर ननावरे, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे,मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड, उद्यान अधिक्षक योगेश वाळुंज, कार्यकारी अभियंता हरविंदसिंह बन्सल, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### पीओपी व शाडू मातीच्या मूर्तींची नोंद ठेवा

आयुक्त शेखर सिंह यांनी गणेश विसर्जन घाटांवर विसर्जन केल्या जाणाऱ्या उत्सव मूर्तींची नोंद ठेवण्याचे निर्देशही संबंधित विभागांना दिले आहेत. विसर्जनासाठी आलेल्या मूर्तीची नोंद ठेवताना ती पीओपीची आहे की शाडू मातीची आहे, मूर्तीची उंची पाच फूट किंवा त्यापेक्षा जास्त आहे का, याप्रमाणे तिची नोंद करून ठेवावी, असे आयुक्त सिंह म्हणाले.

आयुक्त शेखर सिंह यांच्या पाहणी दौऱ्याला मोशी खाण येथून सुरुवात झाली. यावेळी आयुक्त सिंह म्हणाले, 'मोशी खाणीकडे येणाऱ्या रस्त्यावर मुरूम टाकून त्याची डागडूजी करावी. याठिकाणी महापालिकेच्या आठही प्रभागांतून येणाऱ्या गणेश उत्सव मूर्तींच्या विसर्जनासाठी पुरेसे कर्मचारी नियुक्त करण्यात यावेत. आरोग्य विभाग व सुरक्षा रक्षकांची पथके येथे कार्यरत ठेवावीत. आवश्यक तेथे सीसीटीव्हीसह लाईट, मंडप, पिण्याचे पाणी आदी व्यवस्था करण्यात यावी,' असेही आयुक्त सिंह यांनी सांगितले.मोशी खाणीनंतर आयुक्त सिंह यांनी मोशी येथील इंद्रायणी नदी विसर्जन घाट, पिंपरी येथील पवना नदीवरील झुलेलाल घाट, सांगवी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घाट अशा प्रमुख घाटांची पाहणी केली. यावेळी आयुक्त शेखर सिंह म्हणाले, 'विसर्जन घाटांवर गर्दीचे नियंत्रण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करा.

विसर्जन घाटांवर पुरेसे कर्मचारी व यंत्रणा कार्यान्वित ठेवा. निर्माल्यकुंडाची व्यवस्था करा. कृत्रिम विसर्जन हौदांच्या स्वच्छतेला प्राधान्य द्या. घाटांवर सुशोभीकरण करा. दिशादर्शक फलक लावा. जीवनरक्षक, अग्निशमन विभागाचे जवान व आपदा मित्र यांची नियुक्ती करा. आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा कार्यान्वित ठेवा. आवश्यक तेथे सीसीटीव्ही लावा. विसर्जन घाटाकडे येणाऱ्या रस्त्यांची डागडूजी करा,' असे निर्देश देखील आयुक्त सिंह यांनी संबंधित विभागप्रमुख, क्षेत्रीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिले.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे १०५ वी जयंती जल्लोषात साजरी

## घरकुलमधील समाजबांधव आणि नागरिकांचा कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**जगविख्यात साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीचे आयोजन घरकुल परिसरात अतिशय थाटामाटात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात करण्यात आले. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित या भव्यदिव्य कार्यक्रमात 'गौरव माझा महाराष्ट्राचा' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. घरकुल स्थापनेपासून पहिल्यांदाच यावर्षी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मारुती जाधव यांच्या पुढाकाराने ही जयंती साजरी करण्यात आली.**




कार्यक्रमाला घरकुलमधील समाजबांधव आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या निमित्ताने घरकुलमधील सामाजिक, शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या तरुणां व तरुणींचा सन्मान अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचे पुस्तक देऊन करण्यात आला. यामुळे तरुण वर्गाने अण्णाभाऊंच्या आदर्शांचा लाभ घेण्याची संधी मिळाली. सोहळ्याला आमदार महेश लांडगे, आमदार अमित गोरखे, सामाजिक कार्यकर्ते निलेश नेवाळे, सौ. कीर्ती मारुती जाधव, अरुणा भोसले, अरुण पाडुळे, पोपट हजारे, अजय पाताडे, गोरख पाटील, अजय साने, उस्तव कमिटी प्रमुख बाबासाहेब रसाळ, रोहिणी रोकडे, संदीप रोकडे, कविता कांबळे, मधुरा कांबळे, धनंजय भिसे, संदीपान झोंबाडे, भारती कांबळे, पल्लवी निकाळजे, दीपाली लोखंडे, ज्योती जाधव, दीक्षा जाधव, संतोष जाधव, निखिल आरणे, आकाश आढागळे, आकाश चव्हाण, दत्तात्रेय धर्मे, आदी सर्वजण उपस्थित होते. प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनीही या कार्यक्रमाला हातभार लावला.